**हे नवे वर्ष आपणां सर्वांस आरोग्यसंपन्नतेचे, सर्वांगीण प्रगतीचे, सुखसमृद्धीचे व मन:शांती देणारे असे सिद्ध होवो, ही सदिच्छा !**

# राशिभविष्य - जानेवारी, २०१९.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==================================================================

**(१) मेष -** सध्या या राशीच्या प्रथम स्थानी हर्षल ग्रह असल्यामुळे या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असावा, असे वाटते. तसे असेल तर कोणाचाही धाक वा दडपण सहन होत नसावे. शिवाय कोणी काही विचारले, समजावून सांगितले तर तो अपमान समजून संताप व्यक्त केला जात असला पाहिजे. या राशीची लहान मुले तर अतिशय वांड, खोडकर अशी झाली असण्याची शक्यता आहे. असे असले तरी हा हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होणे संभवते. या राशीच्या अन्य नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात अडचणी, अडथळे, मानसिक ताण, वरिष्ठांचा विरोध, मानसिक आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. भाग्यस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काहींना दूरच्या प्रवासाचे योग्य संभवतात. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या गुरु-शुक्र या शुभ ग्रहांमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत योग आहेत अशापैकी काहींना अचानक धनलाभ होणे संभवते. तसेच वारसा हक्काने धनलाभ होणेही शक्य दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक जीवनात काही अनिष्ट घटना घेण्याची शक्यता दिसते. कुटुंबात भांडणे, त्रास, अन्य कटकटी निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. पण महिन्याच्या अखेरच्या दहा-बारा दिवसांत परिस्थितीत सुधारणा होईल व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून आहे तीच नोकरी वा व्यवसाय करावा. नवीन काही करण्याचा प्रयत्न अंगाशी येईल. जपा. मंगळ ग्रह पूर्णपणे अशुभ असून अनावश्यक खर्च, आर्थिक चिंता, वाद, भांडणे यांमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. काहींना मानहानीचा अनुभव येईल. लाभस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे काही मंडळींना कुमार्गी मित्रांकडून नुकसान सहन करावे लागेलसे दिसते. तसेच आर्थिक नुकसान होणे, आर्थिक घोटाळे होणे, अर्थप्राप्तीस विलंब होणे अशापैकी त्रास सहन करावा लागेलसे दिसते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करा. तसेच “श्रीहनुमानचालिसा” स्तोत्राचे पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल.
केवळ सप्तम स्थानी असलेल्या गुरु-शुक्र या शुभ ग्रहांमुळे या राशीच्या युवक-युवतींना व विवाहेच्छूना
काळ अनुकुल व अपेक्षित ते देणारा असा सिद्ध होईल. विवाहेच्छूचे विवाह ठरतील. काहींचे नवेप्रेमसंबंध
जुळून येतील. काहींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. काही मंडळींना प्रवासाचे योग संभवतात. काहींनाअर्थलाभ होईल, तर या राशीच्या ज्या स्त्रियांचा प्रसूतिकाळ या महिन्यात आहे त्यांना पुत्रलाभ होणे संभवते. विवाहित मंडळींना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या तृतीय स्थानी

असलेल्या राहूमुळे हातून कर्तृत्व घडेल, मानसिक शक्ती लाभेल, हातून काही पराक्रम घडेल, पण हा राहू बंधुसुखात बाधा आणण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना या येईल. कामात अडचणी, अडथळे निर्माण होणे, असमाधानकारक घटना घडणे, मानसिक ताण सहन करावा लागणे, काहींना पदावनतीचे दु:ख सहन करावे लागणे, यात भर म्हणून शारीरिक अनारोग्याचा त्रास सहन करावा लागणे अशापैकी घटना घडणे संभवते. काही मंडळींच्या संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. महिन्याच्या पूर्वार्धात बुध ग्रह काही प्रमाणात अनुकुल होईल व दिलासा मिळेल; पण महिन्याच्या उत्तरार्धात तोही प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या दशम स्थानी असलेला नेपच्यून केवळ मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थांचे व्यापारी यांनाच अनुकुल व लाभदायक होईल. पण इतर नोकरी-व्यवसाय असणारांच्या कार्यक्षेत्रात अस्थिर परिस्थितीच निर्माण करील. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे खूप कष्ट परिश्रम करूनच अपेक्षित अर्थलाभ होणे संभवते. शिवाय हा मंगळ मैत्रीत वितुष्ट आणू शकेल. जपा. पण या मंगळामुळे काहींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होण्याची शक्यता आहे. व्ययस्थानी असलेल्या हर्षलमुळे काहींना वाईट प्रसंगाला तर काहींना जिवावरच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. शिवाय तो अकारण शत्रुत्व निर्माण करण्याची शक्यताही नाकारता येणार नाही. काही मंडळींना सांपत्तिक अडचणी त्रस्त करतील. श्रद्धा असेल तर शिवोपासना मन:शांती देऊ शकेल. दररोज एक माळ "ओम नम: शिवाय " मंत्राचा जप करा. तसेच "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या अंडळींनी या महिन्याच्या काळात सर्वांगीण आरोग्य जपले पाहिजे. कारण या राशीच्या काही मंडळींना पोटविकाराचा त्रास होणे संभवते. काहींना विविध कारणांनी मनस्ताप, दु:ख,
प्रिय व्यक्ति वियोगाचे दु:ख सहन करावे लागेलसे दिसते. पण षष्ठ स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे परिस्थिती आटोक्यात राहील. तसेच याच स्थानी असलेल्या शुक्रामुळे गुण असूनही प्रगती होत नाही, प्रगतीची संधी मिळत नाही, याचे असह्य दु:ख सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. धनस्थानी असलेल्या राहूमुळे कुटुंबात वाद, भांडणे होण्याची शक्यता आहे. तसेच काही मंडळीना आर्थिक चिंता त्रस्त करील.जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्ध अधिक प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. इच्छा आकांक्षा अपूर्ण राहतील. नोकरीत कामाचा ताण व वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. हाती घेतलेल्या कामात अडचणी, अपयश येणे संभवते. पण बुध ग्रहाच्या अनुकुलतेने महिन्याचे अखेरचे दहा दिवस मनोनुकुल घटना घडून दिलासा मिळेल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला नेपच्यून अध्यात्माची मनापासून आवड असणारांना अनुकुल होईल व उपासनेद्वारे मन:शांती मिळेल. तसेच काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. पण औषध विक्रेते आणि यांत्रिक तांत्रिक व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. तसेच बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना व विद्यार्थ्यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे मित्रांशी भांडणे होतील. जपा. पण हा हर्षल आर्थिक लाभ देण्याची शक्यताही दिसते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. पण त्याचा लाभ घेण्यासाठी उत्तम शारीरिक आरोग्य राखता आले पाहिजे. पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. तसेच भांडणतंट्याचा मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या केतुमुळे काहीही कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ज्यांची कोर्ट प्रकरणे असतील त्यांनी प्रकरणाचा निकाल लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न करावा. पंचम स्थानी असलेले गुरु=शुक्र ग्रह बौद्धिक व कलात्मक शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुकुल होतील व त्यांना शैक्षणिक प्रगती करणे सहज शक्यच होईल. ज्यांचे प्रेमसंबंध असतील ते दृढ होतील. अर्थलाभ होणेही शक्य दिसते. कलात्मक व्यवसाय असणारांनाही काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांनाही काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या हर्षलमुळे चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात नोकरी असणाऱ्या नोकरदार मंडळींना आपल्या कार्यक्षेत्रात प्रगती केल्यामुळे बढती मिळू शकेल. शिवाय अन्य लाभही होणे संभवते. शक्यतो या महिन्याच्या काळात प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप व मानहानी होण्याची शक्यता आहे. तसेच जलभय असल्याने जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच विष भय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या राहूमुळे सतत अपमान सहन करावे लागतील. त्यामुळे संताप येऊन बदला घेण्याचा विचार मनात घर करील. पण मनावर व विचारावर नियंत्रण ठेवून आचरण कराल तर काही काळानंतर मन शांत होईल. या राहूमुळे काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना करा. दररोज नियमितपणे एक माळ “ ओम नम: शिवाय “ मंत्राचा जप करा. तसेच “शिवलीलामृत” स्तोत्राचे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात वरिष्ठांचा जाच सहन करावा लागण्याची शक्यता वाटते. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना दीर्घ चिकाटीने प्रयत्न केले गेले तरच यश मिळू शकेल. घरगुती जीवनात महिन्याच्या पूर्वार्धात संततिसमस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. . प्रिय जनांपासून दुरावा निर्माण होणे संभवते. गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पूर्ण होतील. ज्यांची शेतीवाडी आहे त्यांना त्यापासून भरपूर लाभ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात हितशत्रू असतील तर ते पराभूत होतील. पण काही मंडळींना नव्याने हृदयविकाराचा आजार होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या दहा दिवसांत बुध ग्रह अनुकुल होणार असल्याने अपेक्षित कार्यसिद्धी होईल. काही मंडळींना धनलाभ तर काहींना कीर्ति -प्रसिद्धी मिळणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी शनि ग्रहाच्या कुंभ राशीतील नेपच्यून वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच या राशीच्या अष्टम स्थानी असलेला मंगळ ग्रह उष्णताकाराचे आजार निर्माण करील, असे वाटते. काही मंडळींना मूळव्याधीचा आजार त्रस्त करील. हा मंगळ अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. हाडमोड होणे संभवते. तसेच वीज भय असल्याने विजेवर चालणारी उपकरणे सावधानतेने हाताळा . त्याचप्रमाणे जलभय असल्याने जलप्रवास करू नका. पोहोण्याचा मोह टाळा. अपेक्षाभंग झाला तर नैराश्य येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल व कार्यात अपेक्षित प्रगती होत असल्याचे समजेल. त्यामुळे खूप

समाधान वाटेल. या हर्षलमुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील; तर काहींना संशोधन कार्यासाठी परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या व्ययस्थानी असलेला राहू अर्थलाभ देणे संभवते. तसेच तोही परदेशगमनाची संधी देऊ शकेल. तसेच तो हितशत्रूपासून रक्षण करील. पण तो वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते.
जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व दिलासा मिळेल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. केवळ या राशीच्या लेखकांना ग्रंथ लेखनास काळ अनुकुल होईल व काहींना यात्रा-प्रवासाचे योग येतील. पण भावंडांकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. गुरु ग्रहाबरोबर शुक्र ग्रहही या राशीच्या तृतीय स्थानी आहे. त्यामुळे काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री -ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या शुक्र ग्रहामुळे काही मंडळींना धनलाभ होईल, तर काहींना मानाचे स्थान मिळून प्रतिष्ठा प्राप्त होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे विविध कारणांनी गृहसौख्यात बाधा निर्माण होणे संभवते. त्यामुळे दु:ख, मनस्ताप झाल्यास नैराश्य येणे संभवते. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे कौटुंबिक त्रास, संतति समस्या, अनारोग्य, नोकरीत वरिष्ठांचा जाच, प्रिय जनांपासून होणारा दुरावा, नियोजित कार्यात होणारी दिरंगाई अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात घरगुती सुखाचे दृष्टीने थोडा अनुकुल होईल. मित्रसुख मिळेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात केतूसह असल्यामुळे संतति समस्या त्रस्त करीतसे दिसते. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. अनारोग्य, छोटेमोठे अपघात होणे संभवते. म्हणून सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा पतिपत्नीत वाद, मतभेद, भांडणे झाल्यास वैवाहिक जीवनातील सुखात बाधा पडेल. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय वा अन्य कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला हर्षल ग्रह अपघातास कारणीभूत होईल. म्हणून सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या लाभस्थानी असलेला राहू करू नये त्या गोष्टी करण्यास प्रवृत्त करील. जुगाराचा मोह होईल, आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धन मिळविण्याचा मोह होईल; पण कटाक्षाने या गोष्टी टाळाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. या राहूमुळे संततिविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना उपयुक्त होईल व मानसिक स्वास्थ्य लाभेल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. दशम स्थानी असलेल्या राहूमुळे शासकीय नोकरदार मंडळींपैकी बौद्धिक कार्यक्षेत्र असणाऱ्या काही मंडळींना बढती मिळू शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात घरीदारी सर्व ठिकाणी विरोधी परिस्थिती निर्माण होणे संभवते. अनारोग्याचा त्रास, अपेक्षाभंग होणे, कामात दिरंगाई होणे, धनाचा अपव्यय होणे, आर्थिक चिंता निर्माण होणे,कौटुंबिक त्रास सहन करावा लागणे अशापैकी घटना घडणे संभवते. तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करीतसे वाटते. पण

या शनीमुळे  काही मंडळींना  अपेक्षित अशी उत्तम नोकरी मिळू  शकेल.  काहींना  आवडीचे कार्यक्षेत्र मिळेल.  मात्र हितशत्रूंपासून सावध  राहा. महिन्याच्या उत्तरार्धात  बुध  ग्रहामुळे  थोडे फार गृहसौख्य  व मित्रसुख   मिळू शकेल;  पण   अविचाराने  धननाश  होणे  संभवते  .जपा.  प्रतिकुल   परिस्थितीमुळे मनस्थिती अतिशय  भावनाशील होणार असली तरी या राशीच्या पंचम स्थानी असलेला नेपच्यून ग्रह आध्यात्मिक उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नतिबरोबरच गूढ संशोधनासही उपयुक्त होईल.  या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या हर्षलमुळे जीवनसाथीचे  विक्षिप्त  आचरण, पतिपत्नीत होणारे गैरसमज, वाद, भांडणे   यामुळे   वैवाहिक  जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ज्यांची  कोर्ट प्रकरणे असतील  त्यांनी ती  पुढे ढकलण्याचा   प्रयत्न  करावा.  ज्यांचा  भागीदारीत व्यापार-व्यवसाय  आहे  त्यांनी  संशय किंवा अन्य  कारणाने   भागीदारीत  बाधा  येणार  नाही   याची काळजी  घ्यावी.  या राशीच्या  दशम  स्थानी असलेल्या राहूमुळे   शासकीय  सेवेत   असणारांपैकी   काहींना अधिकारपद   मिळू शकेल, तर काहींचा विशेष  कामगिरीबद्दल  सन्मान  केला  जाईल.  या  राशीच्या  धनस्थानी  असलेल्या   गुरु-शुक्र  या शुभ ग्रहांमुळे  कौटुंबिक जीवनात शुभ घटना घडतील. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात वाढ होईल. कर्जबाजारी असतील त्यांची कर्जफेड होऊ  शकेल.  कौटुंबिक  सुखसमाधान  मिळेल. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना अनुकुल  होईल. दररोज नियमितपणे  कुलदैवत स्तोत्राचे  पठण  करा.

**(८) वृश्चिक -**  या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना  या महिन्याचा उत्तरार्धच  अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळींच्या कामावर वरिष्ठ  प्रभावित होतील. त्यामुळे  काही मंडळींना बढती, एखाद्यास उच्च
पद   किंवा मानाचे स्थान मिळण्याची शक्यता दिसते.   त्यामुळे शारीरिक-मानसिकअरोग्यही उत्तम राहील. पण    वाहिन्याच्या पूर्वार्धात वाढत्या खर्चाची चिंता, त्यात भर म्हणून  आर्थिक  नुकसान होणे, कुटुंबात  वाद,  भांडणे  होणे,   अनिष्ट  घटना  घडणे,  डोळ्याचे  अनारोग्य  होणे,   अशा  प्रकारच्या  घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. प्रथम स्थानी असलेल्या  गुरु-शुक्रापैकी  गुरु ग्रहामुळे बौद्धिक संशोधन कार्यात कार्यरत असणारांना  अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. लेखकांच्या लेखनास प्रसिद्धी मिळेल. शुक्रामुळे   वैवाहिक जीवनात सुखसमाधान  लाभेल.  या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे घरगुती  गोष्टींबाबत गैरसमज,घोटाळे होऊन घरातील वातावरण  अशांत राहीलसे दिसते. या राशीच्या पंचम स्थानी असलेला मंगळ  ग्रह  वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना  अनुकुल असला तरी मुलापैकी कोणाचे आजारपण, कोणाचे   अयोग्य   आचरण अशापैकी घटनांनी अस्वस्थ व्हाल.   या राशीच्या गर्भवती  स्त्रियांनी अकारण दगदग करू नये.  काही मंडळींना  स्थावरसंबंधी समस्या  त्रस्त करील.  या राशीच्या षष्ठ  स्थानी असलेला हर्षल  ग्रह शास्त्रीय संशोधन कार्यास पूरक होणार असला तरी त्याच्यामुळे काही मंडळींना  मुदतीचा  ताप येणे संभवते . मनस्थिती अस्थिर,  चंचल  राहील.  सतत अति विचार करू  नका. डोकेदुखीचा आजार त्रस्त  करील.  काही मंडळींना तर  मेंदूविकार होणेही संभवते. जपा.   या राशीच्या   भाग्यस्थानी   असलेल्या राहूमुळे  प्रवासाचे योग येतील. पण    काहींच्या मनात गुन्हेगारी   विचार प्रबळ होणे संभवते. जपा.  श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल   होईल   व दिलासा  मिळेल.  दररोज  नियमितपणे  “ ओम  गं  गणपतये  नमः:”  मंत्राचा  २१ वेळा  जप करा. तसेच “ श्रीगणेश अथर्वशीर्ष “ स्तोत्राचे   व  “श्रीहनुमानचालिसा”  स्तोत्राचे  पठण  करा.

**(९) धनु  -**  या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार   मंडळींना   घरीदारी या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल   असल्याचाच   अनुभव  येईल.  केवळ  उच्च   बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत

असणारांना काळ काही प्रमाणात अनुकुल होणे शक्य दिसते. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे या राशीच्या क्वचित कोणास अंतर्ज्ञान प्राप्त होण्याची शक्यता दिसते. तसेच कलाक्षेत्रातील मंडळींना तो पोषक होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या व्यय स्थानी असलेले गुरु-शुक्र हे दोन्ही ग्रह अनुकुल आहेत. गुरु ग्रह अध्यात्म साधना करत असणारांना प्रगतिकारक होईल. तसेच समाजकार्याची आवड असणारांना त्यांच्या कार्यात प्रगतिकारक होईल. शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. रवि -शनि हे दोन्ही शत्रू ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनारोग्यकारक होणार आहेत. सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडत गेल्यास गहिरे नैराश्य येईल. जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मन सतत शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे दूर ठिकाणी राहण्यास जाणे झाल्यास मन अस्वस्थ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात विविध कारणांनी आर्थिक चिंता त्रस्त करतील. नेपच्यूनमुळे काही मंडळींना जलप्रवासाचे योग येतील तर काहीना परदेशवारीची संधी मिळेल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला मंगळ ग्रह कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे , गैरसमज व असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी बाधा निर्माण करण्याची दाट शक्यता आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेला हर्षल ग्रह कलाकारांच्या कलेस पोषक असून प्रगतिकारक होईल. तसेच बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना प्रगतिकारक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या राहूमुळे या राशीच्या ज्या ,मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व दिलासा मिळेल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे"चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात शारीरिक अनारोग्य व मनस्ताप देणाऱ्या घटना यांचा असह्य त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. या काळात सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व आवश्यकतेनुसार करण्याचा प्रयत्न करा. काही मंडळींना कोर्ट प्रकरणाचा त्रास सहन करावा लागेल. काहींना मनस्तापजनक मानहानीच्या घटना सहन कराव्या लागतील. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. हाती घेतलेल्या कामात अपयश येणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणाऱ्यानी प्रयत्नपूर्वक सहनशील बनून मन आणि बुद्धी शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. काही मंडळींना शरीरातील त्राण नाहीसे करणारा थकवा येणे संभवते. कुसंगतीपासून दूर राहावे. वाहन धोका असल्यामुळे वाहन नियंत्रित वेगाने व सावधानतेने चालवा. तसेच रस्त्याने चालताना मागेपुढे पाहात लक्षपूर्वक चाला. अस्वस्थ व संतप्त मनस्थितीमुळे घरात व बाहेर कोणाशी पटणार नाही, आहे त्या परिस्थितीत सुख लाभणार नाही, वास्तुसुख मिळणार नाही. सतत तक्रारी करत राहून सर्वांनाच मनस्ताप द्याल. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. काही मंडळींच्या मनात कपटी विचार प्रबळ होतील. जपा. वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. अशा प्रतिकुल परिस्थितीतही केवळ गुरु-शुक्र या शुभ ग्रहांची अनुकुलता असल्यामुळे जन्मकुंडलीतील योगानुसार काही युवकयुवतींना विवाहयोग संभवतो. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. काहींना नवे मित्र मिळतील. शुक्रामुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना व हनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे " ओम नमः शिवाय " मंत्राचा

एक माळ  जप करा.  तसेच “हनुमानचालिसा “ स्तोत्राचे  पठण करा. शनि  ग्रहाच्या साडेसातीचा  काळ असल्याने   या राशीच्या मंडळींनो, सतत सहनशीलतेने आचरण  करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या  मंडळींची मनस्थिती सध्या अतिशय कोमल  झाली असल्याचे जाणवते. तसे असेल तर मानसिक  संवेदनाही  अति  शीघ्र  होत असल्या पाहिजेत. तसेच मन उदास झाले असावे, असे वाटते.  त्यामुळे मनाविरुद्‌ध थोडे काही घडले तर  लगेच गहरे  नैराश्य येत असावे, असे वाटते.  पण या राशीच्या   बौद्‌धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र  असणारांनी  नैराश्य झटकून टाकून नव्या उमेदीने  कार्यरत व्हावे.  कारण या कार्यक्षेत्रासाठी  हर्षल ग्रह  अतिशय अनुकुल असून त्याच्यामुळे चौकस अशी बौद्‌धिक शक्ती, स्मरणशक्ती व आकलनशक्ती  प्राप्त होणार आहे.  तसेच या राशीच्या काही भाग्यवंत मंडळींना  परदेशगमनाची संधीही  मिळण्याची शक्यता आहे. तसेच या राशीच्या दशम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे  या राशीच्या काही मंडळींच्या  कर्तृत्वामुळे  त्यांचेव वरिष्ठ  कौतुक करतील व त्यांचा मानसन्मान  होण्याची शक्यता दिसते. या दशम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे  काही मंडळींना नवे आवडते कार्यक्षेत्र  मिळणेही संभवते.  पण या राशीच्या दशम स्थानी गुरु ग्रहाबरोबर  शुक्र ग्रहही  असल्याने या राशीच्या स्वतंत्र व्यवसाय असणारांना व्यवसायात येणाऱ्या  अडचणींना  तोंड देणे सहज शक्य होईल.  या राशीच्या  षष्ठ  स्थानी असलेल्या राहूमुळे  ज्यांचा  अन्य जातिधर्माच्या लोकांशी व्यावसायिक   संबंध  आहे  अशांना अशा संबंधामुळे  आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. तसेच हा राहू हितशत्रूंचा  बीमोड करू शकेल.  पण त्याच्यामुळे  विष भय असल्याने  रस्त्यावर  विकले जाणारे उघड्यावरचे  पदार्थ  खाऊ नका.  त्यामुळे काही मंडळींना  पोटाचे अनारोग्य त्रस्त  करण्याची शक्यता दिसते.  या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या  महिन्याचा  पूर्वार्धच अनुकुल  होणार असल्याने त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते  महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा.  रवि  ग्रहाबरोबर  बुध ग्रह   व शनि  ग्रहही आहेत. तेही अनुकुल  असून  त्यांच्यामुळे  धनलाभ, मित्रलाभ   व सुखसमाधान   मिळू शकेल.  पण या शनि ग्रहामुळे  संतति समस्या  त्रस्त  करण्याची शक्यता दिसते. मात्र महिन्याच्या उत्तरार्धात  केतू ग्रहामुळे  स्वभाव  लहरी  होणे  संभवते. तसेच मनस्ताप देणाऱ्या  घटना  घडण्याची शक्यता दिसते. जपा.  श्रद्‌धा असेल तर “शिवोपासना” अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.  दररोज नियमितपणे “ओम नम: शिवाय” मंत्राचा एक माळ  जप करा.

**(१२) मीन -** या  राशीच्या   मंडळींचा वर्तमान स्वभाव  अतिशय  हट्‌टी, मानापमान फार असणारा असा झाला  असावा, असे वाटते. असे असेल तर या स्वाभाविक दोषामुळे  या राशीच्या  सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना  या महिन्याच्या काळात नोकरीत मनाविरुद्‌ध घडणाऱ्या   घटनांमुळे अकारण शरीरपीडा, श्रम, दगदग   सहन करावी  लागण्याची शक्यता दिसते.  त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणेही संभवते. परंतु एकंदरीत पाहता गुणवान, कर्तबगार  नोकरदार मंडळींना  या महिन्याच्या संपूर्ण काळात विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. पण या राशीच्या  वाचा स्थानी असलेल्या हर्षल  ग्रहामुळे  स्वभाव अति चंचल, अस्थिर, अविचारी, फटकळ   होणे संभवते. आपल्या फटकळ, अविचारी  बोलण्यामुळे समोरच्या माणसाचा अकारण अपमान कराल व घनिष्ट संबंधात दुरावा निर्माण कराल.  जपा.  तसेच अविचाराने खर्च होणे,  हातून विचित्र आचरण  घडणेही संभवते.  जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेला राहू कमिशन, दलाली वर व्यवसाय करत  असणारांना लाभदायक होईल.  पण  तो या राशीच्या मंडळींच्या संततिसुखात   विविध कारणांनी  बाधा निर्माण करीतसे दिसते.  महिन्याच्या पूर्वार्धात  या राशीच्या दशम स्थानी रवि - शनि

युतीत असल्याने महिन्याचा पूर्वार्ध अविस्मरणीय अशा शुभ घटनांनी युक्त असा असल्याचा अनुभव येईल. बुध ग्रहाच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुख व मित्रसुख लाभेल. धनलाभ होणेही संभवते. शिवाय प्रवासाचे योगही संभवतात. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -बुध या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर नोकरी-व्यवसायात विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. भाग्यस्थानी असलेल्या गुरु-शुक्र या शुभ ग्रहांमुळे अध्यात्माची मनापासून आवड असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे व मन:शांती मिळविणे शक्य होईल. शुक्रामुळे सतत मनोनुकुल घटना घडतील व समाधान लाभेल. मात्र काल्पनिक चिंता करू नका. त्यामुळे विनाकारण मिळणाऱ्या सुखसमाधानात बाधा येईल. या राशीच्या व्ययस्थानी असलेला नेपच्यून ग्रह गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना सात्विक सुखसमाधान देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====